बीड । महाराष्ट्र
सोमवार दि. २३/०२/२०२६
वर्ष ५ वे । अंक ३२३
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये




संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955 E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

I RNI/MAHMAR/2021/80074 I Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 I https://marathwadapatra.com I https://epaper.marathwadapatra.com










## नरेंद्र मोदी स्टेडियमवर टीम इंडियाचा 'फुसका' बार, ICC च्या स्पर्धेत...

# अहमदाबादमध्ये भारत पुन्हा पराभूत

### लाखो प्रेक्षक, कोट्यवधी चाहत्यांमध्ये सन्नाटा




**वृत्तसंस्था**

अहमदाबाद नरेंद्र मोदी स्टेडियम आणि भारतीय चाहत्यांचे तुटलेले हृदय... हे समीकरण जणू आता पाचवीलाच पुजलंय. २०२३ च्या वनडे वर्ल्ड कप फायनलमधील त्या पराभवाच्या आठवणी अजून पुसल्या गेल्या नव्हत्या, तोच याच मैदानावर आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ च्या सुपर-८ च्या अत्यंत महत्त्वाच्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेने टीम इंडियाचा ७६ धावांनी धुव्वा उडवला. या पराभवासोबतच भारताची सेमीफायनलची वाट बिकट झाली असून, अहमदाबादचे मैदान भारतीय संघासाठी 'अनलकी' ठरत असल्याच्या चर्चांना आता उधाण आले आहे.

सुरुवातीला बुमराह-अर्शदीपचा कहर- सुपर-८ सामन्यात भारताविरुद्ध नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीला उतरलेल्या दक्षिण आफ्रिकेची सुरुवात अतिशय खराब झाली. अवघ्या २० धावांवर संघाने तीन महत्त्वाचे बळी गमावले. जसप्रीत बुमराह याने क्विंटन डी कॉकला ६ धावांवर बाद केले. त्यानंतर तिसऱ्या षटकात अर्शदीप सिंगने कर्णधार एडेन मार्करमला केवळ ४ धावांवर पॅव्हेलियनमध्ये पाठवले. चौथ्या षटकात पुन्हा बुमराहने रयान रिकेल्टनला ७ धावांवर बाद करत दक्षिण आफ्रिकेला मोठा धक्का दिला.

डेवाल्ड ब्रेविस आणि डेव्हिड मिलरचा तांडव- यानंतर डेवाल्ड ब्रेविस आणि डेव्हिड मिलर यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. दोघांनी चौथ्या विकेटसाठी ९७ धावांची भागीदारी करत संघाचा डाव १००० धावांच्या पार नेला. मात्र, शिवम दुबेने ब्रेविसला बाद करत ही जोडी फोडली. ब्रेविसने २९ चेंडूत ४५ धावांची आक्रमक खेळी केली, यात ३ चौकार आणि ३ षटकारांचा समावेश होता.

भारतासमोर १८८ लक्ष्य - दरम्यान, ▶▶ उर्वरित पान २ वर

## संसार सुरु होण्यापूर्वीच जोडप्याचा भीषण अपघातात मृत्यू

### आठवडाभरापूर्वी साखरपुडा, धाराशिवमधील घटनेने सगळेच हळहळले

**धाराशिव । प्रतिनिधी**


अवघ्या काही दिवसांपूर्वी साखरपुडा झालेल्या एका तरुण जोडप्याचा धाराशिव येथे भीषण अपघातात मृत्यू झाल्याची काळजाला चटका लावणारी घटना समोर आली आहे. सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्गावर धाराशिव येथील रत्नापूर पाटीजवळ हा अपघात घडला. अपघातग्रस्त कार टोलवेच्या कमानीवर जाऊन जोरात धडकली. ही धडक इतकी भीषण होती की, यामध्ये कारमधील तरुण जोडप्याचा जागेवरच अंत झाला. वाशी तालुक्यातील पारा येथील अक्षय शिनगारे (वय २५) आणि इजोर ▶▶ उर्वरित पान २ वर




## लेकीच्या उपचारासाठी सासरच्यांकडून अपुरी मदत, पतीने महिलेला दिली 'ती' धमकी; घरासमोरच विवाहितेचं टोकाचं पाऊल..

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या अंबाजोगाई शहराजवळ असलेल्या चनई येथे एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका महिलेने टोकाचं पाऊल उचलल्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. सासरच्या लोकांकडून होणाऱ्या सततच्या शारीरिक आणि मानसिक त्रासाला कंटाळून या विवाहितेने गळफास लावून आत्महत्या केल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणी मृत महिलेच्या वडिलांनी दिलेल्या



तक्रारीवरून अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात पती, सासू आणि सासऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नेमकं काय घडलं?

बापु अर्जुन कांबळे (रा. डिसकळ, ता. कळंब, जि. धाराशीव) यांची मुलगी भाग्यश्री हिचे लग्न पाच वर्षांपूर्वी चनई येथील अजय तुकाराम चौरे याच्याशी झाले होते. लग्नानंतर काही काळ ठीक गेल्यानंतर पती अजय याला दारूचे व्यसन जडले. तो भाग्यश्रीला सतत मारहाण करत असे, तर सासू अयोध्या आणि सासरे तुकाराम हे तिला घरकाम येत नाही आणि तू संसार करू शकत नाहीस असे म्हणून टोमणे मारून मानसिक छळ करत होते. दरम्यान, नात आम्रपाली आजारी असताना उपचारासाठी ▶▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### जिल्ह्यात पोलीस पाटील पदासाठी लेखी परीक्षा
#### ३३ केंद्रांवर कलेक्टरांची पाहणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात पोलिस पाटील पदाच्या भरतीसाठी लेखी परीक्षा उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली आहे. जिल्ह्यातील एकूण ३३ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा आयोजित करण्यात आली होती. परीक्षेदरम्यान मा. जिल्हाधिकारी, बीड तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड यांनी विविध परीक्षा केंद्रांना प्रत्यक्ष भेट देत पाहणी केली. या पाहणीवेळी परीक्षेची सुरळीत अंमलबजावणी, केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था, बैठकीची मांडणी, तसेच उमेदवारांसाठी पिण्याच्या पाण्यासह इतर मूलभूत सोयी- सुविधांची तपासणी करण्यात आली. परीक्षा प्रक्रिया पारदर्शक, सुरक्षित आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडली जावी, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या. यंदाच्या भरती प्रक्रियेत एकूण ११७९ पदांसाठी ११,३२५ उमेदवारांनी अर्ज केले असून मोठ्या संख्येने उमेदवारांनी ▶▶ उर्वरित पान २ वर

### बीड येथे ई सेवा मल्टी सर्विसेस व गारमेंट मॅन्युफॅक्चरिंग प्रशिक्षाण कार्यक्रमाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र बीड यांच्या संयुक्त विद्यमाने एक महिना कालावधीचे अनिवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत ई-सेवा मल्टी सर्विसेस तसेच गारमेंट मॅन्युफॅक्चरिंग प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश हा की अनुसूचित जाती प्रवर्गातील युवक व युवतींनी तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेऊन स्वतःचा स्वयंरोजगार सुरू करावा किंवा या तांत्रिक माहितीच्या आधारे रोजगार मिळवावा.सदर प्रशिक्षणात संबंधित विषयाचे प्रॅक्टिकल सह तांत्रिक ज्ञान तसेच उद्योजकीय ज्ञान जसे उद्योग उभारणी कशी करावी, शासकीय कर्जविषयक /अनुदान योजनांची माहिती, प्रकल्प अहवाल, विक्री कला, उद्योग व्यवस्थापन, उद्योगांना भेटी, कर कायदा लायसन याविषयीची माहिती इत्यादी बाबींविषयी तज्ञ मार्गदर्शकाद्वारे प्रशिक्षण दिल्या जाईल, सदर प्रशिक्षणासाठी लाभार्थींची निवड प्रत्यक्ष मुलाखती द्वारे ई-सेवा मल्टी सर्विसेस प्रशिक्षणासाठी ३० प्रशिक्षिणार्थी व गारमेंट▶▶ उर्वरित पान २ वर

## अपघातात एकाचा जागीच मृत्यू

### बुलेटची दुचाकीला जोरदार धडक,महिला गंभीर जखमी

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील जालना रोड परिसरात रविवारी (दि. २२ फेब्रुवारी) दुपारी सुमारे १ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. एका हॉटेलच्या बाजूला नवीन मोंढा रोडकडे जाणाऱ्या रस्त्यावर बुलेट मोटारसायकलने क्सेस दुचाकीला जोराची धडक दिल्याने एक जण जागीच ठार झाला असून एक महिला गंभीर जखमी झाली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, अपघात इतका जोरात होता की क्सेसवरील व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. तर सोबत असलेली महिला गंभीर जखमी झाली असून तिला तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले आहे. मृत व्यक्ती नामगाव येथील रहिवासी असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनाही याची माहिती देण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## सराफा व्यापाऱ्याला भरदिवसा लुटले!

### अंबाजोगाई तालुक्यातील खळबळजनक घटना

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील डीघोळ अंबा गावाजवळ शनिवारी सकाळी सव्वा नऊ वाजेच्या सुमारास एका सराफा व्यापाऱ्याला अडवून त्याच्या डोळ्यात मिरची पूड टाकत अंदाजे ५ लाख ८५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लुटल्याची धक्कादायक घटना घडली आहे. धारूर तालुक्यातील बिभीषण गणपती गायके हे व्यापारी आपल्या दुचाकीवरून जात असताना दोन मोटारसायकलवरून आलेल्या चार अज्ञात हल्लेखोरांनी हा धाडसी दरोडा टाकला. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात आणि विशेषतः व्यापारी वर्गात भीतीचे आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार बिभीषण गायके हे दर शनिवारी व्यवसायानिमित्त डीघोळ अंबा गावात दागिने विक्रीसाठी जातात. शनिवारी सकाळी ते जुन्या होळ मार्गाने डीघोळअंबा शिवारातील दर्ग्याजवळ पोहोचले असता पाठीमागून आलेल्या २० ते २५ वयोगटातील चार तरुणांनी त्यांची दुचाकी अडवली. आरोपींनी काहीही विचार करण्यापूर्वीच गायके यांच्या डोळ्यात लाल तिखट फेकले ज्यामुळे त्यांना काहीही दिसणे अशक्य झाले. याच संधीचा फायदा घेत चोरट्यांनी त्यांच्याकडील दागिन्यांची बॅग हिसकावून पोबारा केला. या बॅगेत १२ ग्रॅमचे गंठण, ४ ग्रॅमचे झुंबर, कानफुले आणि मंगलसूत्र असे एकूण ५ लाख ८५ हजार रुपये किमतीचे मौल्यवान दागिने होते. घटनेची माहिती मिळताच युसुफ वडगाव पोलिसांनी घटनास्थळी ▶▶ उर्वरित पान २ वर

## अतिशय दु:खद घटना



**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील गवळवाडी (अहिल्यानगर) येथील काळे परिवारातील भगिनी श्रीमती निलाबाई एकनाथराव जारकड यांचा एकुलता एक मुलगा, चि. राहुल एकनाथ जारकड (वय २४ वर्ष) याचे बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी रोजी पुणे येथे हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले. अत्यंत तरुण वयात झालेल्या या आकस्मिक निधनामुळे जारकड व काळे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण गवळवाडी व काळेवाडी ग्रामस्थांवर शोककळा पसरली आहे. ही घटना मनाला चटका लावणारी आहे. आज परिवाराची सांत्वन भेट घेऊन त्यांच्या दुःखात सहभागी झालो. ईश्वर दिवंगत आत्म्यास चिरशांती देवो व जारकड परिवारास या दुःखातून सावरण्याची शक्ती प्रदान करो, ही प्रार्थना. -राजेंद्र मस्के. जिल्हाध्यक्ष - राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बीड

# गुंता सुटला! सरपंच पाहणार प्रशासक म्हणून कारभार

### मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी राज्य सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींबाबत राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेत प्रशासकपदाचा गुंता सोडवला आहे. आता ज्या ग्रामपंचायतींची मुदत २८ फेब्रुवारीपर्यंत संपत आहे, त्या ठिकाणी विद्यमान सरपंचालाच प्रशासक म्हणून नेमले जाणार आहे. यामुळे ग्रामपातळीवरील प्रशासनात सातत्य राहणार असून अचानक बदलामुळे




निर्माण होणारी पोकळी टळणार आहे.

याआधी जानेवारी महिन्यात काढलेल्या परिपत्रकानुसार, २०२६ मध्ये मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला होता. मात्र, राज्यातील ग्रामपंचायतींची मोठी संख्या आणि विस्तार अधिकाऱ्यांची मर्यादित उपलब्धता लक्षात घेता प्रशासनासमोर अडचणी निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे सरकारने सुधारित निर्णय घेतला आहे.

सरपंचच प्रशासक, उपसरपंच आणि सदस्यांची समिती मदतीला -नव्या निर्णयानुसार, ग्रामपंचायतीची मुदत संपण्याच्या दिवसापर्यंत जे सरपंच पदावर असतील, त्यांनाच प्रशासक म्हणून नेमण्यात येईल. त्यांच्या मदतीसाठी विद्यमान उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांची प्रशासकीय समिती स्थापन केली जाणार आहे. यामुळे स्थानिक पातळीवर निर्णय प्रक्रिया सुरळीत राहण्यास मदत होईल आणि नव्या व्यक्तींना प्रशासन समजून घेण्यासाठी लागणारा वेळ वाचेल.

प्रशासकाचा कालावधी किती?

- प्रशासक आणि प्रशासकीय समितीचा कालावधी त्यांच्या नेमणुकीपासून सहा महिने किंवा संबंधित ग्रामपंचायतीची निवडणूक पूर्ण होईपर्यंत, जे आधी होईल तेवढा राहणार आहे. हा तात्पुरता उपाय ▶▶ उर्वरित पान २ वर

◆ संपादकीय...

# मातृभाषेला संपन्न करणे आपल्याच हाती!

नुकताच जागतिक मातृभाषा दिन संपन्न झाला. आजमितीला जागतिक पातळीवर सात हजाराहून अधिक मातृभाषा आहेत तर केवळ भारतात २२ प्रमुख भाषांसह सुमारे १३०० मातृभाषा आहेत. झपाट्याने होणारे जागतिकीकरण, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि अन्य भाषांनी मातृभाषेवर केलेली कुरघोडी यांमुळे अनेक मातृभाषा लोप पावत चालल्या आहेत. मातृभाषेचे संवर्धन व्हावे आणि त्या भाषेची संस्कृती टिकून राहावी यासाठी १९९९ पासून २१ फेब्रुवारी हा दिवस जागतिक मातृभाषा दिवस म्हणून साजरा केला जाऊ लागला आहे. एकाच मातृभाषेतील लोकांनी एकत्र येऊन मातृभाषेतील शिक्षण, साहित्य आणि संस्कृती यांबाबत चर्चा करून तिच्या संवर्धनासाठी ठोस कार्यक्रम आखावेत हा यामागील प्रमुख उद्देश आहे. सर्वाधिक भाषा बोलले जाणारे भारत हे जगातील एकमेव राष्ट्र असून भारतातही काही मातृभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत, तर काहींचा व्यवहारात होत असलेला वापर कमी होत चालला आहे. २१ फेब्रुवारीला जागतिक मातृभाषा दिन आणि २७ फेब्रुवारीला मराठी राजभाषा दिवस म्हणून राज्यात उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी समस्त मराठी भाषिक मंडळींकडून व्हाट्सअप वर मराठी भाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या जाता, मराठी भाषेचे गोडवे गाणाऱ्या कविता, गाणी आणि सुविचार सामाजिक माध्यमांच्या स्टेटस आणि स्टोऱ्यांवर ठेवले जातात. काही मंडळी या दिवशी एकमेकांशी आवर्जून मराठीत संवाद साधतात. सामाजिक संस्था, मंडळे, राजकीय पक्ष विविध उपक्रम राबवतात आणि त्यानिमित्ताने मराठी भाषेचे महत्व सांगणारी व्याख्याने दिली जातात. २७ फेब्रुवारीला शाळांतूनही मराठी राजभाषा दिवस उत्साहाने साजरा केला जातो मात्र दिवस सरला की दुसऱ्या दिवशी पुन्हा येरे माझ्या मागल्या.

इंग्रजी भाषेने मातृभाषांवर केलेली घुसखोरी ही आज एक जटील समस्या बनली आहे. व्यवहारात पुढे जायचे असेल, तर इंग्रजीला पर्याय नाही हा मोठा गैसमज भारतीय जनतेत निर्माण झाल्यामुळे आज इंग्रजी आणि कॉन्व्हेंट शाळांमध्ये आपल्या पाल्यांना घालणाऱ्यांचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. महाराष्ट्रात त्यातही राज्यातील प्रमुख शहरांमध्ये हे प्रमाण वर्षागणिक वाढू लागले आहे, पाल्यांना इंग्रजी भाषा शिकण्यासाठी आणि त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व निर्माण होण्यासाठी पालकांकडून अतिरिक्त शिकवण्या लावल्या जातात. इंग्रजी भाषेचा सराव व्हावा यासाठी घरातही मुलांना इंग्रजीत संवाद साधण्याची सक्ती केली जाते. परिणामी मातृभाषा मराठी असूनही अशा मुलांना मराठी भाषा परकीय वाटू लागते. मराठी भाषेचे सौंदर्य आणि त्यातील पैलू यांना कधी उमगतच नाहीत. लहानपणापासूनच परकीय भाषेचे कित्ते गिरवल्याने मातृभाषेतील परवलीचे शब्द वगळता अन्य शब्दांचे ज्ञान या पिढीकडे मुळातच नसते. मातृषेतील शब्दभांडार, त्यातील सौंदर्य आणि त्यातील लेखन संपदा यांपासून ही पिढी दुरावू लागली आहे. हे असेच चालू राहिले, तर येणाऱ्या काही वर्षांत मराठी मातृभाषा औषधालाही शिल्लक राहील का, हा प्रश्नच आहे. मातृभाषेच्या संवर्धनासाठी व्यवहारिक पातळीवर इंग्रजीचे वाढलेले अवास्तव महत्व कमी करण्याची आवश्यकता असून राज्य पातळीवर मातृभाषेचाच अधिकाधिक वापर केला जायला हवा आणि त्यासाठी मातृभाषेविषयी पालकांमध्ये जागृती होणे अत्यंत महत्वाचे आहे.


मूळ मराठी भाषेवर देववाणी संस्कृतचा प्रभाव असल्याने ती अधिक समृध्द आणि प्रगल्भ आहे. तिच्या प्रत्येक शब्दामध्ये अर्थ दडलेला आहे. राज्यातील संस्कृतीवर आरंभी इस्लामी आणि नंतर इंग्रजी आक्रमकांनी हल्ले केल्यामुळे येथील सध्याच्या बोली भाषेवर उर्दू आणि इंग्रजी भाषेचा प्रभाव अधिक जाणवतो. आपल्या नेहमीच्या बोलण्यातही एका वाक्यात दोन ते तिन परकीय शब्द आपण सहजपणे उच्चारत असतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केल्यानंतर, मराठी भाषाशुद्धीचे प्रयत्न युद्धपातळीवर केले. परकीय शब्दांना हद्दपार केले. त्यानंतर स्वातंत्र्यवीर सावरकरांनीही मराठी भाषेला तिचे गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी आणि तिचे सौंदर्य खुलवण्यासाठी आपल्या कार्यकाळात अथक प्रयत्न केले. बोलीभाषेतील परकीय शब्द शोधून त्यांना पर्यायी मराठी शब्द शोधून काढले. त्यानंतरही अनेकांनी भाषाशुद्धीसाठी प्रयत्न केले आहेत. या सर्वांचे योगदान लक्षात घेऊन आपणही आपल्या मायमराठीला तिचे मूळ स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, जेणेकरून येणारी पिढी आपला वारसा पुढे चालवेल.

आपल्या मालकीच्या वस्तूंविषयी आपली आसक्ती असते मग आपल्या मातृभाषेविषयी आपल्या मनात आकस का ? मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वप्रथम तिच्याविषयी आपल्या मनात प्रेम निर्माण होणे अत्यंत गरजेचे आहे. आणि प्रेम तेव्हाच निर्माण होईल जेव्हा दैनंदिन व्यवहारात आपण तिचा अधिकाधिक वापर करू. वापर करणे म्हणजे केवळ मराठी बोलणे नव्हे, तर दैनंदिन व्यवहारात परकीय शब्द टाळून शुद्ध मराठी बोलणे. काही वस्तूंची निर्मितीच गेल्या काही वर्षांत झाली असल्याने त्यांना पर्यायी मराठी शब्द सध्यातरी नाहीत, असे शब्द वगळता ज्या ज्या शब्दांना पर्यायी मराठी शब्द आहेत, त्यांचा वापर तर आवर्जून केला पाहिजे. यासाठी घरी वाहिन्यांवर सासू सुनांच्या मालिका पाहण्याऐवजी मराठीतील पौराणिक आणि ऐतिहासिक मालिका पाहाव्यात. प्राचीन ग्रंथांचे आणि पुस्तकांचे वाचन करावे. इतरांशी बोलताना मग समोरचा कोणत्याही भाषेचा का असेना आपल्या बोलण्याची सुरुवात मराठीतच व्हायला हवी. आपल्या पाल्यांना स्वभाषेचे संस्कार घरातून नियमितपणे दिले गेले पाहिजेत. पाल्यांशी घरामध्ये शुद्ध मराठी भाषेतच संवाद साधायला हवा. त्यासाठी मुलांना सर्वप्रथम मम्मी-डॅडी' ऐवजी आई-बाबा बोलायला लावा. भ्रमणध्वनीवर बोलताना 'हॅल्लो' ऐवजी 'नमस्कार' बोलण्याची सवय स्वतःला लावून घ्या. 'गुड मॉर्निंग-गुड नाईट' ऐवजी सुप्रभात-शुभरात्री बोलण्याची सवय लावा. आपले सण पारंपारिक पद्धतीने साजरे करून मित्र मंडळींना, आप्तेष्टांना सणांच्या शुभेच्छा मराठीतून द्या, मुलांना इंग्रजीतील काल्पनिक पात्रे आणि कार्टून दाखवण्याऐवजी मातृभूमीत होऊन गेलेले पराक्रमी राजे-महाराजे, अवतार, क्रांतिकारक, संत यांच्या गोष्टी सांगा. आपली स्वाक्षरी मराठीतून करा. दारावरील पाटी मराठीतून लावा. व्यक्तीचे नाव लिहिताना नावाआधी श्री., सौ., श्रीमती. कु. ही आरंभाक्षरे लिहिण्याची सवय लावा. आपल्या भाषेचे आपल्यावर अनंत उपकार आहेत. ते फेडायचे असतील तर तिचे संवर्धन करणे आणि तिचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर करणे काळाची गरज आहे.

–जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई

# संत गाडगे बाबा : समाजजागरणाचा दीपस्तंभ

भारतीय समाजाच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी जन्माला आली आहेत की ज्यांनी कोणतीही सत्ता, राजकीय पद, संपत्ती किंवा संघटनात्मक बळ न वापरता समाजमनावर खोलवर आणि दीर्घकालीन प्रभाव टाकला आहे. ही व्यक्तिमत्त्वे लोकांच्या जीवनाशी एकरूप झाली, त्यांच्या दुःखांशी संवाद साधला आणि कृतीतून परिवर्तनाचा मार्ग दाखवला. अशाच थोर समाजसंतांच्या परंपरेतील एक तेजस्वी, पण अत्यंत साधा दीप म्हणजे संत गाडगे बाबा होय. २३ फेब्रुवारी हा दिवस त्यांच्या जयंतीचा असला तरी तो केवळ एका संताचा जन्मदिन नाही, तर सामाजिक स्वच्छता, मानवतावाद, विवेकनिष्ठ अध्यात्म, श्रमप्रतिष्ठा आणि समतेच्या मूल्यांचा सार्वजनिक उत्सव आहे. संत गाडगे बाबांचे जीवन हे वैयक्तिक मोक्षसाधनेपेक्षा सामाजिक उद्धारासाठी समर्पित होते.




संत गाडगे बाबांचा जन्म २३ फेब्रुवारी १८७६ रोजी विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील शेणगाव या छोट्याशा खेड्यात झाला. त्यांचे मूळ नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर असे होते. गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या डेबूजींना बालपणापासूनच दारिद्र्य, कष्ट, उपासमार आणि सामाजिक विषमतेचा सामना करावा लागला. औपचारिक शिक्षण फारसे मिळाले नाही, परंतु जीवनाच्या शाळेतून त्यांनी जे शिक्षण घेतले ते अत्यंत व्यापक, खोल आणि समाजपरिवर्तनाची दिशा देणारे होते. लहान वयातच त्यांनी ग्रामीण समाजातील अस्वच्छता, अंधश्रद्धा, दारूचे व्यसन, जातिभेद, कर्मकांड आणि स्त्रियांची दुर्दशा यांचे विदारक चित्र पाहिले. या वास्तवाने त्यांचे मन अस्वस्थ झाले आणि हीच अस्वस्थता पुढे समाजप्रबोधनाची प्रेरणा ठरली.

गाडगे बाबांचे आयुष्य पारंपरिक अर्थाने संन्यस्त नव्हते. त्यांनी कोणताही मठ स्थापन केला नाही, आश्रम उभारला नाही किंवा औपचारिक शिष्यपरंपरा चालवली नाही. त्यांच्या हातात ग्रंथाऐवजी झाडू होती, अंगावर फाटकी वस्त्रे होती आणि चेहऱ्यावर समाजासाठी झिजणाऱ्या माणसाचे तेज होते. त्यांनी लोकांना सांगितले की देव दगडात नाही, तो माणसात आहे; पूजा कर्मकांडात नाही, ती सेवेत आहे; आणि अध्यात्म पलायनात नाही, तर समाजाशी बांधिलकी ठेवण्यात आहे. त्यांनी स्वतः हातात झाडू घेऊन गावोगावी सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ केली आणि स्वच्छतेला नैतिक व आध्यात्मिक मूल्य प्राप्त करून दिले. स्वच्छता हा संत गाडगे बाबांच्या कार्याचा केंद्रबिंदू होता, पण ती केवळ भौतिक स्वच्छतेपुरती मर्यादित नव्हती. त्यांच्या दृष्टीने स्वच्छता म्हणजे विचारांची, वर्तनाची आणि सामाजिक रचनेची स्वच्छता होती. अस्वच्छ परिसर म्हणजे रोगांना आमंत्रण, रोग म्हणजे दारिद्र्य आणि दारिद्र्य म्हणजे अज्ञान, अशी साखळी त्यांनी लोकांना समजावून सांगितली. स्वच्छता म्हणजे आरोग्य, आणि आरोग्य म्हणजेच समाजाचा खरा धर्म, ही त्यांची ठाम भूमिका होती. आज स्वच्छतेवर राष्ट्रीय स्तरावर चर्चा होते, परंतु शंभर वर्षांपूर्वी गाडगे बाबांनी ही चळवळ प्रत्यक्ष कृतीतून सुरू केली होती.

गाडगे बाबांचे समाजप्रबोधन हे भाषणांपुरते मर्यादित नव्हते. ते स्वतः नाल्या साफ करत, कचरा उचलत, धर्मशाळा, बाजारपेठा आणि यात्रास्थळे स्वच्छ करत आणि त्याच वेळी लोकांशी संवाद साधत. त्यांच्या कीर्तनांमध्ये चमत्कार, अवतारकथा किंवा भीतीवर आधारित धर्म नव्हता. त्यांच्या कीर्तनांचा केंद्रबिंदू होता शिक्षण, विवेक, व्यसनमुक्ती, जातिभेदाचा निषेध आणि स्त्रीपुरुष समानता. साध्या, लोकभाषेतील उदाहरणांनी ते गंभीर सामाजिक प्रश्न मांडत आणि त्यामुळे सामान्य माणसाला ते आपले वाटत.

दारूचे व्यसन हे ग्रामीण समाजाच्या अधःपतनाचे एक मोठे कारण आहे, हे गाडगे बाबांनी अचूक ओळखले होते. दारूमुळे कुटुंब उद्ध्वस्त होते, महिलांवर अत्याचार वाढतात, मुलांचे शिक्षण बिघडते आणि आर्थिक परिस्थिती ढासळते. म्हणूनच त्यांनी दारूबंदीचा आग्रह धरला. त्यांनी व्यसन करणाऱ्यांवर टीका केली, पण द्वेष केला नाही. परिवर्तन हे दंडाने नव्हे, तर प्रबोधनाने होते, हा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या प्रभावामुळे अनेक गावांमध्ये दारूची दुकाने बंद झाली आणि व्यसनमुक्तीचे वातावरण निर्माण झाले. शिक्षणाबाबत गाडगे बाबांची भूमिका अत्यंत स्पष्ट आणि दूरदृष्टीची होती. विद्या विणा मती गेली, मती विणा नीती गेली, नीती विणा गती गेली, गती विणा वित्त गेले, या ओळींमधून त्यांनी शिक्षणाचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण म्हणजे केवळ नोकरी किंवा पद मिळवण्याचे साधन नसून विवेक, नैतिकता आणि सामाजिक जबाबदारी निर्माण करणारी प्रक्रिया आहे, असे ते मानत. त्यांनी गरीब, अनाथ आणि वंचित मुलांच्या शिक्षणासाठी निधी गोळा केला आणि अनेक शाळा, वसतिगृहे व शैक्षणिक उपक्रमांना मदत केली.

जातिभेद आणि अस्पृश्यता या सामाजिक विकृतींवर गाडगे बाबांनी अत्यंत ठाम भूमिका घेतली. त्यांनी सर्व माणसे समान आहेत, ही भूमिका केवळ शब्दांत न ठेवता कृतीतून दाखवली. त्यांनी दलित वस्त्यांमध्ये जाऊन स्वच्छता केली, त्यांच्या सोबत भोजन केले आणि त्यांना माणूस म्हणून सन्मान दिला. देव जर सर्वांचा निर्माता असेल, तर माणसामाणसात भेद कसा, हा प्रश्न त्यांनी समाजासमोर उभा केला. त्यांच्या विचारांमध्ये संत तुकाराम, संत कबीर आणि महात्मा फुले यांच्या परंपरेचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. स्त्रियांच्या प्रश्नांबाबतही गाडगे बाबांची भूमिका प्रागतिक होती. त्यांनी स्त्रीशिक्षणाचे समर्थन केले, बालविवाहाचा निषेध केला आणि स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. समाजाचा खरा विकास तेव्हाच होतो, जेव्हा स्त्रियांना सन्मान, शिक्षण आणि स्वातंत्र्य मिळते, असे ते ठामपणे सांगत. त्यांच्या कीर्तनांमधून त्यांनी स्त्रीपुरुष समानतेचा संदेश दिला आणि कुटुंबसंस्थेतील स्त्रीचे महत्त्व अधोरेखित केले. गाडगे बाबांचे अध्यात्म कर्मकांडविरहित आणि विवेकनिष्ठ होते. उपास, व्रत, तीर्थयात्रा यांपेक्षा उपाशी माणसाला अन्न देणे, आजारी व्यक्तीची सेवा करणे आणि अज्ञान दूर करणे हेच खरे पुण्यकर्म आहे, असे ते मानत. त्यांनी अंधश्रद्धेचा तीव्र निषेध केला आणि श्रद्धेला विवेकाची जोड दिली. त्यांचे अध्यात्म माणसाला माणूस बनवणारे होते. गाडगे बाबांचे जीवन म्हणजे सतत चालत राहण्याचे, भटकंतीचे जीवन होते. त्यांच्या पायात चप्पल नव्हती, डोक्यावर छत्री नव्हती, आणि खांद्यावर एक झोळी होती. या झोळीतून त्यांनी लोकांकडून मिळालेला पैसा स्वतःसाठी कधीही वापरला नाही. तो पैसा समाजकार्यासाठी, शिक्षणासाठी आणि गरजूंना मदतीसाठी खर्च केला. त्यांनी संपत्ती साठवली नाही, कारण त्यांच्या मते समाजसेवेतच खरे वैभव आहे.

आजच्या काळात, जेव्हा धर्माचे राजकारण केले जाते, अध्यात्माचे व्यापारीकरण झाले आहे आणि समाजमाध्यमांवर दिखाऊ सेवाभाव दिसतो, तेव्हा संत गाडगे बाबांचे विचार अधिकच सुसंगत वाटतात. त्यांनी संस्था उभारली नाही, पण विचारांची चळवळ निर्माण केली. त्यांनी ग्रंथ लिहिले नाहीत, पण त्यांचे संपूर्ण जीवनच एक चालते-बोलते ग्रंथ होते.

२३ फेब्रुवारी रोजी संत गाडगे बाबांची जयंती साजरी करताना केवळ प्रतिमापूजन, भाषणे किंवा मिरवणुका पुरेशा नाहीत. त्यांच्या विचारांचे आचरण हेच खरे अभिवादन आहे. परिसराची स्वच्छता राखणे, अंधश्रद्धेला विरोध करणे, व्यसनांपासून दूर राहणे, शिक्षणाला प्राधान्य देणे, जातिभेद नाकारणे आणि मानवतेला धर्म मानणे हीच गाडगे बाबांची शिकवण आहे. संत गाडगे बाबा हे केवळ एका जातीचे, एका प्रदेशाचे किंवा एका काळाचे नव्हते. ते संपूर्ण मानवजातीचे होते. त्यांनी समाजाला आरसा दाखवला, प्रश्न विचारायला शिकवले आणि बदलाची दिशा दिली. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे ही आजच्या काळाची गरज आहे. कारण जिथे स्वच्छता, समता, विवेक आणि करुणा आहे, तिथेच खरा धर्म आहे आणि हाच संत गाडगे बाबांचा अमर संदेश आहे.

**–डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

◆ पान ९ वरून पुढे...

## नरेंद्र मोदी स्टेडियमवर...

डेव्हिड मिलरनेही तुफानी फलंदाजी करत ३५ चेंडूत ६३ धावा केल्या. त्याच्या खेळीत ७ चौकार आणि ३ षटकार होते. अखेरीस त्याला वरुण चक्रवर्तीने बाद केले. शेवटच्या षटकांत ट्रिस्टन स्टब्सने २४ चेंडूत नाबाद ४४ धावांची झंझावाती खेळी करत संघाचा डाव १८७ धावांपर्यंत पोहोचवला. त्याने १ चौकार आणि ३ षटकार लगावले. भारताकडून बुमराहने सर्वाधिक ३ बळी घेतले, तर अर्शदीप सिंगने २ विकेट्स घेतल्या. वरुण चक्रवर्ती आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी १ बळी घेत दक्षिण आफ्रिकेचा डाव रोखला. १८८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाची सुरुवात अत्यंत खराब झाली. पॉवरप्लेच्या ६ षटकाअखेर भारताने ३१ धावांवर आपले ३ महत्त्वाचे फलंदाज गमावले आहेत. सलामीवीर ईशान किशन शून्यावर बाद झाला, तर तिलक वर्मा (१) आणि अभिषेक शर्मा (१५) हे देखील झटपट माघारी परतले. त्यानंतर या पाठोपाठ वॉशिंग्टन सुंदरदेखील बाद झाला असून त्याने ११ चेंडूत ११ धावा केल्या. सूर्यकुमार यादव काही वेळ स्थिर राहिला, तर हार्दिक पांड्या १८ धावा करून बाद झाला. ८ विकेट गमावल्यानंतर धावसंख्या ८८ पर्यंत पोहोचली. टीम इंडियासाठी, फक्त शिवम दुबे दक्षिण आफ्रिकेच्या गोलंदाजांसमोर टिकू शकला. त्याने ३७ चेंडूत ४२ धावा केल्या. पण टीम इंडियाला फक्त १११ धावा करता आल्या. दक्षिण आफ्रिकेने भारताला ७६ धावांनी हरवून धक्का दिला. मैदान भारतीय होते, चाहते भारतीय होते आणि परिस्थिती टीम इंडियाला अनुकूल होती, परंतु दक्षिण आफ्रिकेने विजय मिळवला.

## संसार सुरु...

येथील मुलगी अक्षया सुनील चव्हाण (वय २३, सध्या मुक्काम वाशी) यांचा गेल्या रविवारी (दि. १५) मांजरसुंबा येथील कन्हेया मंगल कार्यालयात साखरपुडा झाला होता. मयत अक्षया हिला रविवारी लातूर येथे महापारेषणची परीक्षा होती. त्यासाठी ती आणि अक्षय हे दोघे पहाटे वाशी येथून लातूरकडे निघाले होते. रत्नापूर पाटीजवळील वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने भरधाव कार टोलवेच्या कमानीवर जाऊन आदळली. यामध्ये दोघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. साखरपुड्यानंतर अवघ्या आठवडाभरात या

◆ पान ९वरून पुढे...

दोघांच्या प्रेमकहाणीचा दुर्दैवी शेवट झाला आहे. या घटनेमुळे धाराशिवमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे.

## लेकीच्या उपचारासाठी...

पाच हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. गरिबीमुळे बापु कांबळे यांनी दोन-तीन हजार रुपये पाठवले, मात्र पूर्ण पैसे का दिले नाहीत यावरून अजयने भाग्यश्रीला मारून टाकण्याची धमकी दिली होती. सीताफळाच्या झाडालाच... या जाचाला कंटाळून भाग्यश्रीने १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी साडेआठ वाजेच्या सुमारास राहत्या घरासमोरील सीताफळीच्या झाडाला नायलॉनच्या दोरीने गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. या घटनेची माहिती मिळताच मुलीच्या माहेरच्यांनी अंबाजोगाईत धाव घेतली. मुलीच्या मृत्यूस पती अजय तुकाराम चौरे, सासू अयोध्या तुकाराम चौरे आणि सासरे तुकाराम चौरे हे जबाबदार असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात या तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०८, ११५(२), ३(५), ३५१(२) आणि ३५२ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रविकुमार राजेंद्र पवार करत आहेत.

## सराफा व्यापाऱ्याला...

धाव घेतली असून आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. लुटारूंनी आपले चेहरे रुमालाने बांधले होते अशी माहिती पीडित व्यापाऱ्याने पोलिसांना दिली आहे. भरवस्तीच्या आणि वर्दळीच्या रस्त्यावर अशा प्रकारे धाडसी चोरी झाल्याने खळबळ उडाली असून व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून तातडीने तपासाची चक्रे फिरवली आहेत.

## गुंता सुटला! ...

असून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होताच नियमित निवडून आलेले पदाधिकारी कारभार स्वीकारतील. २८ फेब्रुवारीपर्यंतच लागू निर्णय -राज्य सरकारने जारी केलेल्या परिपत्रकानुसार हा निर्णय सध्या २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींसाठीच लागू राहणार आहे. या कालावधीत प्रशासक

◆ पान ९ वरून पुढे...

आणि प्रशासकीय समिती नेमण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे असतील. प्रशासनातील अडचणी टाळण्यासाठी बदल- राज्यातील मोठ्या संख्येने ग्रामपंचायतींची मुदत संपत असल्याने सर्वत्र बाहेरील प्रशासक नेमणे व्यवहार्य ठरणार नव्हते. पंचायत समित्यांमधील विस्तार अधिकाऱ्यांची मर्यादित संख्या ही देखील मोठी अडचण होती. ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन सरकारने स्थानिक स्तरावरच विद्यमान सरपंच आणि त्यांच्या टीमकडे तात्पुरता कारभार सोपवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रशासनात सातत्य, पारदर्शकता आणि वेग राखला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## जिल्ह्यात पोलीस पाटील...

परीक्षेत सहभाग नोंदविला. जिल्हा प्रशासनामार्फत परीक्षा शांततापूर्ण व नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात येत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. उमेदवारांनी संयम व शिस्त राखून परीक्षा द्यावी, तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## बीड येथे ई सेवा ...

मॅन्युफॅक्चरिंग प्रशिक्षणासाठी ३० याप्रमाणे केली जाणार आहे. सदरील सदरील कार्यक्रमाच्या सविस्तर माहितीसाठी देण्यासाठी एक दिवशीय उद्योजकता परिचय कार्यक्रम दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी तुळशी कम्प्युटर सायन्स अँड आयटी कॉलेज आदर्श नगर डीपी रोड बीड या ठिकाणी सकाळी ११:०० वाजता मार्गदर्शन मेळावा आयोजित केलेला आहे त्या ठिकाणी प्रशिक्षणाविषयी सविस्तर माहिती दिली जाईल व इच्छुक लाभार्थींचे अर्ज स्वीकारले जातील. तरी इच्छुक व्यक्तींनी दिनांक २४/०२/२०२६ पर्यन्त आपला अर्ज महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एम सी ई डी) द्वारा जिल्हा उद्योग केंद्र गुडलक हॉटेल च्या बाजूस जालना रोड बीड येथे संपर्क सौ. ज्योती गायकवाड , प्रोग्राम ऑर्गनायझर मो नं. ९८८१९०७७५१ व बाबासाहेब महानोर प्रोग्राम ऑर्गनायझर मो नं.९५४५६६८३२९ यांचेशी संपर्क साधावा व कार्यालयात येऊन आपला प्रवेश अर्ज भरावा किंवा एमसीडीच्या वेबसाईट www.mced.co.in/Barti या link वर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी

◆ पान ४ वरून पुढे...

## जागतिक महिला दिनानिमित्त...

येईल.अधिक माहितीसाठी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम यांच्याशी ९४२३३९५४४४ किंवा ८९७५३५७०५७ या क्रमांकावर संपर्क साधावा.तालुक्यातील जास्तीत जास्त विविध क्षेत्रातील महिलांनी आपल्या कार्याचा प्रस्ताव पाठवावा, असे आवाहन संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, सचिव गहिनीनाथ पाचबैल, निसार शेख, ड किशोर निकाळजे,राजेंद्र लाड, समीर शेख, अतुल जवणे,सय्यद बबलू,अक्षय विधाते, संतोष नागरगोजे, प्रेम पवळ, सोपान पगारे, मारूती सत्रे, आदिनाथ ठोंबरे,अर्थव डाडर यांनी केले आहे.

## मराठा सेवा संघ च्या वतीने...

भ्रष्टाचाराविरुद्ध निर्भीडपणे लक्ष्यवेधी आंदोलनाद्वारे आवाज उठवणे, सामाजिक जीवनात निष्कलंक चारित्र्य जपणे आणि तरुण पिढीसाठी दीपस्तंभ ठरणारे कार्य करणे या विशेष योगदानाबद्दल त्यांचा गौरव करण्यात आला. पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. ढवळे यांनी मनोगतात सांगितले की, हा पुरस्कार माझ्या कुटुंबीयांनी पाठीवर शाबासकीची थाप दिल्यासारखा आहे. हा सन्मान केवळ माझा नसून समाजहितासाठी अहोरात्र झटणाऱ्या सहकाऱ्यांचा आहे. अन्याय, भ्रष्टाचार व प्रशासकीय अनियमिततेविरुद्ध आवाज बुलंद करण्यासाठी हा सन्मान अधिक जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. यावेळी चळवळीतील सहकारी रामनाथ खोड, माजी सैनिक अशोक येडे, रामधन जमाले, पांडुरंग हराळे, डी.जी. तांदळे, धनंजय सानप, बाजीराव ढाकणे,राजकुमार कदम, अँड.करूणा टाकसाळ, कोमल

◆ पान ४ वरून पुढे...

मस्के, शिवमती वर्षा माने आदींची उपस्थिती होती.

## आष्टी तालुक्याची कामधेनू....

नमुना त्या ऊसाची ऍव्हरेज १०० टन प्रती एकर आहे.लखनऊ चे क्लीन कमिशनर यांना विनंती केली आहे. प्रायोगिक तत्त्वावरती रोपे किंवा बेणे देण्याची मागणी केली आहे. जास्तीत जास्त ऊसाची लागवड शेतकरी बांधवांनी करावी असे आवाहन केले. तालुक्यातील अनेक वर्षांपासून बंद पडलेल्या साखर कारखान्याच्या पुनरुज्जीवनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले. कारखाना परिसरात श्रीफळ वाढवून विधिवत पूजन करून नव्या सुरुवातीची घोषणा करण्यात आली.वेदमंत्रांच्या उच्चारात पूजा करण्यात आली आणि कारखाना लवकरच सुरू होण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, कारखाना सुरू झाल्यास परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल तसेच स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतील. अनेक वर्षांपासून बंद असल्याने परिसराच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला होता. आता नव्या व्यवस्थापनाच्या माध्यमातून कारखाना पुन्हा कार्यरत करण्यासाठी आवश्यक त्या प्रक्रिया सुरू करण्यात आल्या आहेत. शेतकरी व नागरिकांनीही कारखाना लवकरात लवकर सुरू व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त केली असून या पूजन सोहळ्यामुळे परिसरात आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.या कार्यक्रमास कार्यकारी संचालक व कारखान्याचे सर्व अधिकारी, कर्मचारी, कामगार बांधव मोठ्या उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## महाराष्ट्राला वेटरन्स...

खेळाडूंना पुन्हा एकदा मैदान गाजवण्याची संधी मिळणार आहे. राज्यात क्रीडा संस्कृतीला चालना देणारा हा उपक्रम ठरणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## आदित्य पॉलिटेक्निकच्या...

सुरक्षिततेसाठी राबविल्या जाणाऱ्या उपाययोजनांचा प्रत्यक्ष अभ्यास केला. या वेळी स्टेशन मास्टर अतुल मराठे यांनी विद्यार्थ्यांना भारतीय रेल्वेची प्रशासकीय व तांत्रिक कार्यपद्धती समजावून सांगितली. रेल्वे मार्गांची रचना, सिग्नल व नियंत्रण प्रणाली, ट्रॅक देखभाल, तसेच अपघात टाळण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या खबरदाऱ्या याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. अभियांत्रिकी क्षेत्रात जबाबदारीची जाणीव आणि नियमांचे काटेकोर पालन किती महत्त्वाचे आहे, यावरही त्यांनी विशेष भर दिला. या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना मोठ्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे नियोजन व व्यवस्थापन समजले. तांत्रिक दृष्टिकोन, निर्णयक्षमता, व्यावसायिक शिस्त आणि संघभावना यांचा विकास होण्यास मदत झाली. तसेच भारतीय रेल्वेमधील स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअर संधींबाबत मार्गदर्शन मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वासही वाढला. या भेटीत स्थापत्य विभागाचे विभागप्रमुख प्रा. प्रशांत दुधाळ, प्रा. वरपे, प्रा. अजय दुधाळ, प्रा. गोंठे यांच्यासह ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. भेटीचे नियोजन प्रा. प्रशांत दुधाळ व प्रा. अजय दुधाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी ही भेट ज्ञानवर्धक व प्रेरणादायी ठरली.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# खर्डेवाडी येथे गुरुवारपासून श्रीमद्भागवत कथा सोहळ्याला प्रारंभ

## कीर्तन, हरिपाठ व ग्रंथ भेट उपक्रमाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या त्रिशतकोत्तर बीज उत्सवानिमित्त तसेच किसनराव कळेकर आणि कै. रत्नदीप भागवत कळेकर यांच्या पुण्यस्मरणार्थ खर्डेवाडी (ता. बीड) येथे गुरुवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ पासून श्रीमद् भागवत कथा सोहळ्याचा शुभारंभ होत आहे.

नांदूर फाट्याजवळील खर्डेवाडी येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही तुकाराम बीज उत्सव मोठ्या भक्तीभावात व उत्साहात साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने ह.भ.प. रामचंद्र महाराज जगताप (बीड) यांच्या वाणीतून श्रीमद् संगीत भागवत कथा निरूपण होणार आहे. दररोज दुपारी १ ते ५ या वेळेत भागवत होईल.

सोहळ्यादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दररोज सायंकाळी ६ ते ७ या वेळेत खर्डेवाडी भजनी मंडळाचा हरिपाठ होणार आहे.





### त्रिदिनी किर्तन महोत्सव

या श्रीमद् भागवत कथा सोहळ्याच्या निम्मित तीन दिवस कीर्तनाचे आयोजित करण्यात आले आहेत.यामध्ये ह भ प श्रीनिवास महाराज जगताप,पालसिंगण, ह भ प नारायण महाराज शिरसट आणि ह भ प केशवदास वैष्णव महाराज हिंगणी यांचे हरिकीर्तन होणार आहे या कीर्तनाला गावातील प्रतीक नागरिकांनी सौजन्य केले आहे .

### ग्रंथ भेट उपक्रम

'ज्ञानोबा–तुकोबा आपल्या घरी' या उपक्रमांतर्गत ह.भ.प. हरिदास महाराज सोळंके आणि ज्ञानेश्वरी भावकथा प्रवक्ते ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या संयोजनातून ज्ञानेश्वरी व तुकाराम गाथा या ग्रंथांची स्नेहभेट साधकांना देण्यात येणार आहे. भागवत कथा समाप्ती व जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज बीज उत्सवानिमित्त दि. ५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत ह.भ.प. राजन महाराज भोसले यांचे काल्याचे कीर्तन होणार असून त्यानंतर कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

सात दिवस चालणाऱ्या या भागवत कथेचा श्रवणाचा लाभ पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन आयोजक समस्त कळेकर परिवार,महादेव (नाना ) साळुंके बीड यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अखंडीत बारा वर्षे शिवनेरी वरून पायी चालत शिवज्योत आणणारा मुस्लिम मावळा समीर शेख

**आष्टी । प्रतिनिधी**



आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील उच्चशिक्षित युवक समीर शेख गेल्या बारा वर्षांपासून शिवनेरी किल्ला ते सांगवी पाटणपर्यंत पायी शिवज्योत आणत असून, या उपक्रमातून समाजात एकता, बंधुता व सर्वधर्मसमभावाचा संदेश देत आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रेरणादायी वारसा– छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ पराक्रमी राजे नव्हते, तर आदर्श राज्यकर्ते, कुशल सेनानी व दूरदृष्टी असलेले समाजसुधारक होते. त्यांनी स्थापन केलेले स्वराज्य हे फक्त राजकीय स्वातंत्र्य नव्हे, तर सामाजिक समतेचे प्रतीक होते. जाती–धर्माचा भेद न करता योग्यतेनुसार सर्वांना संधी देणारी प्रशासन व्यवस्था त्यांनी उभी केली. 'प्रजेचे राज्य प्रजेसाठी' हा विचार प्रत्यक्षात आणत त्यांनी हिंदवी स्वराज्याची पायाभरणी केली.

२०० किलोमीटरचा अविरत पायप्रवास– यंदाही समीर शेख यांनी ओंकार खिलारे, दादा इरले व गावातील मावळ्यासह सुमारे २०० किलोमीटरचा पायी प्रवास यशस्वीरीत्या पूर्ण केला. एम.एस्सी., बी.एड., एम.एड. असे उच्च शिक्षण घेतलेले समीर शेख उच्च विचारसरणीचे व समाजासाठी समर्पित युवक म्हणून ओळखले जातात. शिवनेरीवरून प्रस्थान करताना जुन्नर नगरपंचायतीच्या वतीने त्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. धामणगाव येथे शिवज्योत पोहोचल्यावर संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी स्वागत करून त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

हिंदू–मुस्लिम एकोप्याचे जिवंत उदाहरण– यावेळी समीर शेख म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारताना कधीही जाती–धर्माचा भेद केला नाही. अठरा पगड जातींना सोबत घेऊन त्यांनी स्वराज्य निर्माण केले. मी अभिमानाने सांगतो – मी छत्रपतींचा मुस्लिम मावळा आहे. गेल्या आठ वर्षांपासून समीर शेख हे भैरवनाथ जन्माष्टमी सोहळ्यानिमित्त वाराणसी (काशी) येथून गंगाजल आणत आहेत, तर बारा वर्षांपासून शिवनेरी ते सांगवी पाटण शिवज्योत आणण्याची परंपरा ते अविरतपणे जपत आहेत.

समाजासाठी प्रेरणादायी उपक्रम– या उपक्रमात विविध जाती–धर्मातील युवक मोठ्या संख्येने सहभागी होत असून, समाजात एकात्मता, सलोखा व शिवरायांच्या विचारांचा प्रचार–प्रसार होत आहे. हा उपक्रम म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा जिवंत वारसा असल्याची भावना यावेळी ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# माजलगावच्या ईगलवुड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटची प्लेसमेंटमध्ये दमदार कामगिरी

## 54 विद्यार्थ्यांना TATA Autocomp Gotion Green Energy Solutions Pvt. Ltd. मध्ये नोकरीची संधी

**माजलगाव । प्रतिनिधी**



माजलगाव येथील ईगलवुड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये प्लेसमेंट क्षेत्रात लक्षणीय यश मिळवत अंतिम वर्षातील ५४ विद्यार्थ्यांची ढ-ढ- -गींलेी त्रेंळेप त्रीशशप एपशीसू डेश्रीीळेपी झीीं. डींव. या आघाडीच्या कंपनीमध्ये निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशामुळे संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्याचा दर्जा अधोरेखित झाला आहे. संस्थेच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या पुढाकाराने कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले होते. विविध अभियांत्रिकी शाखांतील विद्यार्थ्यांनी या भरती प्रक्रियेत सहभाग घेतला. वैयक्तिक मुलाखतींच्या टप्प्यांतून विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अर्चना पवार, सचिव डॉ. शरद पवार आणि कोषाध्यक्ष डॉ. सुशील भैय्या लोढा यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या परिश्रमांचे कौतुक केले. उद्योगाभिमुख शिक्षण, प्रात्यक्षिकांवर आधारित प्रशिक्षण आणि अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांना हे यश प्राप्त झाले आहे, असे त्यांनी सांगितले. प्राचार्य प्रतिक वेळापुरे आणि टीपीओ ऋतुजा वेळापुरे मॅडम यांनीही विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी सांगितले की, संस्थेत राबविण्यात येणारे सॉफ्ट स्किल्स प्रशिक्षण, औद्योगिक भेटी आणि व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम यांचा विद्यार्थ्यांना मोठा फायदा झाला आहे. इलेक्ट्रिक वाहन (एत) बॅटरी व हरित ऊर्जा क्षेत्रात कार्यरत असलेल्या या कंपनीत काम करण्याची संधी विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची पायरी ठरणार आहे. या यशामुळे ईगलवुड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटने प्लेसमेंट क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला आहे.

# के.एस.पी विद्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती

**बीड । प्रतिनिधी**

(कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करुन शाळेच्या परिसरातुन रॅली काढण्यात आली. मुलांनी छत्रपती शिवाजी महाराजांची वेशभुषा तर मुलींनी पारंपारिक वेशभुषा धारण केली होती.



*डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सलग्न व साहेबराव मस्के पाटील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वैष्णवी महाविद्यालयांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रथम संस्थेचे सचिव प्रा. डॉ. रणजित बन्सीधरराव मस्के पाटील यांनी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्यप्रा. दत्ता वसंत सरवदे व इतर सर्व कर्मचारी उपस्थित होते.*

# आदर्श मित्र मंडळाचा शिवजन्मोत्सव

## जिल्ह्यात रक्ताचा तुटवडा असल्याने घेतले रक्तदान शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

यंदा छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३९६ वा शिवजन्मोत्सव अत्यंत भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.शिवजन्मोत्सव हा केवळ उत्सव नसून तो स्वाभिमान, पराक्रम आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव करून देणारा दिवस आहे. शिवजन्मोत्सव आदर्श मित्र मंडळ कबाडगल्ली बीड च्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवून शिवरायांच्या विचारांना कृतीत उतरवण्याचा प्रयत्न करण्यात आला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन प्रतिमेचे महापुजन करुन अभिवादन केले. आदर्श मित्र मंडळाचा यावर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत ८१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्ताच्या प्रत्येक थेंबातून शिवरायांची मानवतेची शिकवण जिवंत असल्याची जाणीव झाली. या वेळी प्रभाकर क्र.७ मधील सर्व समाज बांधवांनी रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला.







*शेतकरी कृषी सेवा केंद्रचे मालक,युवा उद्योजक रवि लांडे पा. यांचा काल विविध ठिकाणी वाढदिवस साजरा करण्यात आला यावेळी पुर्वाचे गायकवाड साहेब, स्वरूपचे बिंदगे साहेब, पांडूरंग आपा लांडे, बाळू नाना जाधव, तात्या जाधव, सुनिल मुंडे साहेब, आदित्य जाधव,अजिंक्य जाधव, निखिल खोटे आदि उपस्थित होते. (छाया संभाजी लांडे पाटील)*

---

वृक्ष वल्ली आम्हा सोयरे वनचरे

**महाराष्ट्र शासन**

**वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र आष्टी यांचे कार्यालय**

बोरबन सर्वे नं.923 मार्केट यार्ड शेजारी आष्टी ता.आष्टी जि.बीड 414203

ईमेल :- rfosfashti@gamil.com

जा.क्र.अ./सावपअ/योजना/ 433 /सन-2025-26 | आष्टी 431123 | दिनांक 20/02/2026

**निविदा सुचना क्र. 01/2025-26**

वनपरिक्षेत्र अधिकारी,सामाजिक वनीकरण आष्टी हे महाराष्ट्र शासनाकडील उचित वर्गवारीतील नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन निम्न निर्देशित कामाच्या सीलबंध बी 1 निविदा मागवित आहेत. को-या निविदेचा नमुना वनपरिक्षेत्र कार्यालय सामाजिक वनीकरण आष्टी, ता. आष्टी जि. बीड या कार्यालयात दि. 23/02/2026 ते 28/02/2026 पर्यंत दुपारी 4.00 वाजेपर्यंत देण्यात येतील व भरुन पाठविलेल्या निविदा वनपरिक्षेत्र कार्यालय सामाजिक वनीकरण आष्टी यांचे कार्यालयात दि. 28/02/2025 पर्यंत कार्यालयीन वेळेत स्विकृत करण्यात येतील व शक्य झाल्यास त्याच दिवशी उपस्थित ठेकेदारासमक्ष उघडण्यात येतील, निविदा स्विकृतीचे अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी,सामाजिक वनीकरण आष्टी यांनी राखुन ठेवलेले आहेत.

| अ. क्र. | कामाचे ठिकाण | कामाचे नाव / कामाचे प्रकार व गट क्र./सर्व्हे क्र. | कामाची रक्कम | 1% इसारा रक्कम | निविदा फॉर्मची किमंत | कंत्राटदाराचा नोंदणी प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | शेरी बु एकीकृत रोपवाटिका ता.आष्टी | रोपवाटिका अंतर्गत मुरूम रोड तयार करणे | 993300 | 9933 | 100/- | वर्ग चार खुला |
| 02 | शेरी बु एकीकृत रोपवाटिका ता.आष्टी | वनतळे भाग-1 तयार करणै | 856515 | 8565 | 100/- | वर्ग चार खुला |
| 03 | शेरी बु एकीकृत रोपवाटिका ता.आष्टी | वनतळे भाग-2 तयार करणै | 856515 | 8565 | 100/- | वर्ग चार खुला |
| 04 | शेरी बु एकीकृत रोपवाटिका ता.आष्टी | रोपवाटिका मध्ये CD Culvert तयार करणे | 408700 | 4087 | 100/- | वर्ग चार खुला |
| 05 | शेरी बु एकीकृत रोपवाटिका ता.आष्टी | रोपवाटिके मध्ये अंतर्गत PVC पाईप लाईन तयार करणे | 553300 | 5533 | 100/- | वर्ग चार खुला |
| 06 | शेरी बु एकीकृत रोपवाटिका ता.आष्टी | वाहना करीता पार्किन शेड तयार करणै | 421100 | 4211 | 100/- | सु.शि बे अभियंता |
| 07 | शेरी बु एकीकृत रोपवाटिका ता.आष्टी | शेड नेट हाउस उभारणे | 715680 | 7157 | 100/- | सु.शि बे अभियंता |
| | | **एकूण** | 4805110 | - | - | - |

**अटी व शर्ती-**

1. वनपरिक्षेत्र अधिकारी सामाजिक वनीकरण आष्टी यांचे कार्यायात नोटीस बोर्डावर सविस्तर निविदा सुचना पहावयास मिळेल. वनपरिक्षेत्र अधिकारी यांना विनंती केल्यास नोटीशी प्रत विनामुल्य मिळू शकेल.
2. सदर निविदांसाठी शासन निर्णय क्र. निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मां.प्र. १७/मोप्र-१ दिनांक-१८/१०/२०२३ मधील तरतुदी लागु राहतील.
3. कोऱ्या निविदा संचाची मागणी करताना अर्जासोबत निविदा फी ची दुय्यम पावती व कंत्राटदाराचा अर्ज नोंदणी प्रमाणपत्र यांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.
4. ठेकेदाराने दिलेल्या दराची विधी ग्राहयता ३० दिवसापर्यंत राहील.
5. इसा-याची रक्कम राष्ट्रीयकृत किंवा कोणत्याही शेडयुल बँकेची सहा महिन्याची मुदत ठेव पावती किवा धनादेश वनपरीक्षेत्र कार्यालय आष्टी सा.व. यांचे नावाने सादर करावी.
6. कोणतीही/कोणत्याही अगर सर्व निविदा नाकारणेचा वा रदद करणेचा अधिकार वनपरीक्षेत्र कार्यालय आष्टी सा.व. यांनी राखुन ठेवला आहे.
7. वनपाल/वनरक्षक व सबंधित कंत्राटदार यांनी क्षेत्रिय कामाची संयुक्त स्थळ निरिक्षण केल्याचे (जीओटेंगींग) /वनरक्षक वनपाल यांनी दिलेले प्रमाणपत्र निविदेसोबत सादर करणे आवश्यक राहील.
8. वरील निविदा प्रशासकीय मान्यतेला अधिन राहून प्रसिद्ध करण्यात येत आहे.
9. निधी प्राप्त झाला नंतर कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

वनपरिक्षेत्र अधिकारी
सामाजिक वनीकरण आष्टी,कार्यालय

**प्रत** - मा. विभागीय वनअधिकारी सामाजिक वनीकरण बीड यांना माहिती व नोटीस बॉर्डावर प्रसिध्दीसाठी सविनय सादर.
**प्रत** - वनपरिक्षेत्र कार्यालय सामाजिक वनीकरण आष्टी यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डावर लावणेसाठी.
**प्रत** - वनपरिक्षेत्र सामाजिक वनीकरण सर्व यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डावर लावणेसाठी रवाना.

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● सोमवार, दि. २३ फेब्रुवारी २०२६ ●

## मंडपात दहावीची परीक्षा घेणाऱ्या केंद्र प्रमुखावर कारवाई...
# परवानगी देणारे अधिकारी मोकाट!

**बीड । प्रतिनिधी**

वर्गखोल्या अपुऱ्या पडत असल्यामुळे शाळेच्या टेरेसवर मंडप टापून दहावीची परीक्षा घेणाऱ्या केंद्र प्रमुखावर कारवाई करण्यात येणार आहे. मात्र गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी देखील या लाजिरवाण्या प्रकारास



जबाबदार असताना त्यांना मात्र शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील या पाठीशी घालत असल्यामुळे केंद्र प्रमुखांमध्ये संतापाची लाट आहे.

बीड शहरापासून हाकेच्या अंतरावर असलेल्या पुर्ला येथे यशवंत माध्यमिक विद्यालयात दहावीच्या परीक्षेच्या पहिल्याच दिवशी शिक्षण मंडळाच्या कारभाराचे वाण उघडे पडले. वर्गखोल्या अपुऱ्या पडल्याने परीक्षार्थींना चक्क टेरेसवर मंडप टापून बसवण्यात आले.

याप्रकरणी गटशिक्षणाधिकारी समंदर खान आणि शिक्षण विस्तार अधिकारी सिद्धेश्वर माटे हेदेखील तेवढेच जबाबदार असताना केवळ केंद्र प्रमुखावर कारवाई करण्याचे आदेश शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील यांनी दिले. यापुढे केंद्र प्रमुख म्हणून काम करायचे की नाही याचा विचार करावा लागेल, असेही काही केंद्र प्रमुखांनी बोलून दाखवले.

## थोडक्यात...

### सात वर्षीय मुस्कानचा पहिला रोजा पुर्ण



**कडा । प्रतिनिधी**

पवित्र रमजान महिन्याला सुरुवात झाली असून, कडक उन्हाच्या झळा सोसत असतानाही मोठ्यांसोबत आता लहान मुलांमध्येही उपवास करण्याची मोठी जिद्द पाहायला मिळत आहे. आष्टी तालुक्यातील ऊंदरखेल येथील सात वर्षीय मुस्कान सिराज शेख हिने तिच्या आयुष्यातील पहिला रोजा रविवार दिं.२२ फेब्रुवारी २०२६ रोजी यशस्वीपणे पूर्ण करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. वयाने लहान असूनही, पहाटेच्या सहरी 'पासून ते सायंकाळच्या 'इफ्तार पर्यंत अन्नाचा कण आणि पाण्याचा थेंबही न घेता आपला हा पहिला रोजा तिने पूर्ण केला. मुस्कान ने रोजा धरल्यामुळे शेख कुटुंबात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. तिचे वडील सिराज शेख आणि कुटुंबीयांनी मुस्कान चे विशेष कौतुक केले. तसेच नातेवाईक आणि मित्र परिवाराकडून मुस्कानवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### संस्कारमध्ये शिवजयंती निमित्त बालसभेचे आयोजन



**बीड । प्रतिनिधी**

येथील संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली दुसरी विभागामध्ये चिमुकल्यांनी शिवजयंती अतिशय उत्साहात साजरी केली. या निमित्ताने बालसभेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांनी शिवजी महाराजांचा पाळणा, पोवाडे, शिवरायांचे ध्येय,स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा, अफजलखानाचा वध या प्रसंगावर आधारित आपले मनोगत व्यक्त करून, तसेच शिवरायांचे अनेक गीते सादर केली. त्यासोबतच अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून सर्व शिक्षक वृंदांची मने जिंकून घेतली .या निमित्ताने व्यासपीठावर माननीय मुख्याध्यापिका श्रीमती शोभाताई कुलकर्णी व व विभाग प्रमुख श्रीमती विद्याताई पारगांवकर उपस्थित होत्या. तसेच बालसभेच्या अध्यक्षा म्हणून दुसरी क मधील कुमारी तनुश्री बनसोडे, तर प्रमुख पाहुण्या म्हणून कुमारी आरोही शिराळे व्यासपीठावर उपस्थित होत्या. शेवटी चिरंजीव अनिरुद्ध रत्नपारखी याने सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

### प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



**नेकनूर । प्रतिनिधी**

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी.के. हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठी विभागाचे डॉ. अंकुश काळे हे.होते कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तदनंतर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. इनकर व्ही.एस. ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड / शिवणी :जागतिक 'माय मराठी' मातृभाषा दिनाचे औचित्य साधून 'मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था,बीड' यांच्या वतीने शिवणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.मातृभाषेचा गौरव केवळ शब्दांत न करता,प्रत्यक्ष कृतीतून सामाजिक बांधिलकी जपण्याच्या संस्थेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.२१फेब्रुवारी हा जगभरात 'आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन'म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे महत्त्व लक्षात घेत मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेने शिवणी गावातील जिल्हा परिषद शाळेत एक विशेष कार्यक्रम आयोजित केला होता.या कार्यक्रमांतर्गत शाळेतील गरजू आणि होतकरू चिमुकल्यांना वह्या,पेन, पेन्सिल आणि इतर आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी बोलताना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मराठी भाषेची थोरवी, आपल्या मातृभाषेचे महत्त्व आणि वाचनाचे फायदे यावर मार्गदर्शन केले. आपल्या मातृभाषेवर प्रेम करा, तिचे संवर्धन कराआणि शिक्षण घेऊन जीवनात मोठी प्रगती करा,असा मोलाचा संदेश यावेळी विद्यार्थ्यांना देण्यात आला.यावेळी उपस्थित संस्थेचे तेजस पवार,विशाल,शिक्षक,विद्यार्थी होते.*

## जागतिक महिला दिनानिमित्त आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने, विविध क्षेत्रातील महिलांनी राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कारासाठी प्रस्ताव द्यावा

**आष्टी । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून दरवर्षी प्रमाणे यावर्षीही आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने येत्या मार्च महिन्यात राज्यस्तरीय 'नारी सन्मान आदर्श पुरस्कार २०२६' चे आयोजन करण्यात आले आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा या पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे.

पुरस्कारासाठी आदर्श माता, सामाजिक कार्य, शिक्षण, वैद्यकीय, कृषी, पशुवैद्यकीय, अभियांत्रिकी, प्रशासकीय अधिकारी, पोलीस, वकील, क्रीडा, उद्योजिका, सीईओ, मॅनेजर, अकाउंटंट, क्लार्क, बँकिंग, पत्रकारिता, अध्यात्म, साहित्य, राजकीय, ग्रामसेविका, तलाठी, सरपंच, आशावर्कर, नर्स, अंगणवाडी/बालवाडी सेविका, कृषी सहाय्यक, वायरमन, बचत गट, चित्रपट कला, नर्तिका कलाकार, लेडीज टेलर, आदर्श ब्युटी पार्लर संचालिका, आदर्श गृहिणी, आदर्श सासू, आदर्श सून यासह इतर सर्व क्षेत्रांतील महिलांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

इच्छुक महिलांनी आपण करीत असलेल्या कार्याची वृत्तपत्र कात्रणे, मागील पुरस्कारांच्या छायाचित्रांच्या प्रती, अर्ज यासह आपला प्रस्ताव तयार करून ५ मार्च २०२६ किंवा तत्पूर्वी समक्ष अथवा सुचकामार्फत पुढील वॉट्सअॅप क्रमांकावर पाठवावा. योग्य प्रस्तावांची पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल. पुरस्कार वितरण कार्यक्रमाची तारीख नंतर जाहीर करण्यात ▶▶ उर्वरित पान २ वर

## मराठा सेवा संघ च्या वतीने सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे मराठा भूषण पुरस्काराने सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मराठा सेवा संघ च्या वतीने दि.२० रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे दिमाखदार सोहळ्यात सामाजिक क्षेत्रातील प्रामाणिक व विशेष कार्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांना मराठा भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार सुप्रसिद्ध व्याख्याते हनुमंत पवार यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, शाल व श्रीफळ देऊन प्रदान करण्यात आला. यावेळी राजर्षी शाहू बँक चे अध्यक्ष अजय



पाटील, जिल्हा हिवताप अधिकारी विजयसिंह शिंदे, विभागीय अध्यक्ष अशोक ठाकरे तसेच मराठा सेवा संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

सन्मानपत्रात नमूद केल्याप्रमाणे, वैद्यकीय व्यवसाय सांभाळत असताना राजकीय व प्रशासकीय क्षेत्रातील ▶▶ उर्वरित पान २ वर

## आष्टी तालुक्याची कामधेनू महेश सहकारी साखर कारखाना येणाऱ्या गळीत हंगामात सुरू होणार, शेतकरी बांधवांनी ऊस लागवड वाढवावी: मा.आ.भिमरावजी धोंडे

**शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण ; १२ वर्षापासून बंद असलेला साखर कारखाना मा.आ.भिमरावजी धोंडे च्या नेतृत्वाखाली पुनर्जिवित प्रत्यक्षात काम सुरू**

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्याची कामधेनू असलेल्या महेश सहकारी साखर कारखाना मागिल १२ वर्षापासून बंद अवस्थेत होता. साखर कारखाना नवीन संचालक मंडळाच्या ताब्यात गेला आहे. शेतक-यांचे नेते मा.आ.भिमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली संचालक मंडळाने कर्ज भरून कारखाना ताब्यात घेतल्याने शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण निर्माण केला आहे. अनेक वर्षांपासून बंद असलेल्या साखर कारखान्याचे रविवारी दि.२२ फेब्रुवारी रोजी श्रीफळ वाढवून पूजन करून प्रत्यक्ष मशनरी दुरुस्ती व ओव्हर ऑइलिंग कामाचा शुभारंभ मा. आ.भिमरावजी धोंडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून मिल व बायलर डिजी सेट चे विधीवत पुजन करुन प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली पुढील गळीत हंगामात कारखाना सुरू होणारच



असल्याचा विश्वास व्यक्त करत शेतकरी बांधवांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून ऊसाचे उत्पन्न वाढवण्याचे आवाहन मा.आ.भिमरावजी धोंडे यांनी केले ते कडा महेश सहकारी साखर कारखाना प्रत्यक्ष कामकाज पुजन प्रसंगी बोलत होते.यावेळी अजय दादा धोंडे, अभयराजे धोंडे, राजु काका धोंडे, नियामत बेग साहेब, अॅड. हनुमंत थोरवे,आरपीआय तालुकाध्यक्ष अशोक साळवे, राजाराम नन्नवरे, स्विकृत सदस्य बबनराव औटे, हरिभाऊ जंजिरे, सोनाजी गांजुरे, लांडगे मामा, पांडुरंग गावडे,शहादेव गर्जे, नानाभाऊ वाडेकर, अंकुश मुंडे, बजरंग कर्डिले, सरपंच दादा जगताप, सुनिल शिंदे, कुंडलिक आस्वर, पत्रकार उत्तम बोडखे, पत्रकार संजय खंडागळे, पत्रकार संतोष नागरगोजे, पत्रकार अक्षय विधाते, छायाचित्रकार शरद गर्जे, संचालक बाबासाहेब आंधळे, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना मा.आ.भिमरावजी धोंडे म्हणाले की कारखाना अनेक वर्षापासून बंद असल्याने बरेच काम करणे आहे. सहा सात महिन्यांचा कालावधी आहे. या कालावधीमध्ये काम पूर्ण करून पुढील गळीत हंगामामध्ये कारखाना सुरू करणार आहोत. आपल्याला जर लायसन नसतं मिळालं तर हा कारखाना भंगारात विकावा लागला असता काही लोकांचा तसा डाव होता. आपण सर्व जण मिळुन कारखाना सुरू करणार आहोत.हि वास्तु आपल्याला टिकवून ठेवायची आहे.आपण कारखान्यासाठी मोर्चा काढला यासाठी शेतकरी बांधवांनी उसाच्या आता नवीन २५ जातीचे नवीण वाण आले असून आम्ही लखनऊ वरून ७३१८१ जातीचा ▶▶ उर्वरित पान २ वर

## महाराष्ट्राला वेटरन्स क्रिकेट स्पर्धेचे यजमानपद; पत्रकार परिषदेत मोठी घोषणा!

**राज्यातील अनुभवी क्रिकेटपटूंना आपली प्रतिभा पुन्हा दाखवण्याची मोठी संधी मिळणार: शिंदे, जगताप**



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रासाठी अभिमानाची बातमी समोर आली असून वेटरन्स क्रिकेट स्पर्धेचे यजमानपद राज्याला मिळाले आहे. यानिमित्त आयोजित पत्रकार परिषदेत महाराष्ट्र वेटरन्स क्रिकेट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी स्पर्धेबाबत सविस्तर माहिती दिली. असोसिएशनचे अध्यक्ष उदयसिंह शिंदे आणि उपाध्यक्ष किशोर जगताप यांनी यावेळी बोलताना सांगितले की, या स्पर्धेमुळे राज्यातील अनुभवी क्रिकेटपटूंना आपली प्रतिभा पुन्हा दाखवण्याची मोठी संधी मिळणार आहे. तर सचिव अभिजीत कदम यांनी खेळाडूंच्या नियोजनात कुठलीही कमतरता भासणार नाही असे सांगितले. मोहन बडूरे, सहसचिव मोहम्मद फहीम तसेच खजिनदार शर्वरी सूर्यवंशी यांचीही यावेळी प्रमुख उपस्थिती होती. यासोबतच संचालक अभय गजेंद्र गडकर, श्रीकांत जाधव, निरंजन चव्हाण जालना, संजय रंधवे, ड. शेख जाहिद, रंजना कदम आणि मोहम्मद नसीर यांनीही पत्रकार परिषदेत सहभाग नोंदवत आयोजनाबाबतची तयारी आणि नियोजन याची माहिती दिली. या स्पर्धेमुळे महाराष्ट्रातील क्रीडा क्षेत्राला नवी उभारी मिळणार असून वेटरन्स ▶▶ उर्वरित पान २ वर

## आदित्य पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची रेल्वे स्थानकाला औद्योगिक भेट; रेल्वे मार्गरचना आणि सुरक्षिततेचे प्रत्यक्ष निरीक्षण

**ट्रॅक, पूल, स्थानकाचा अभ्यास, ४० विद्यार्थ्यांचा सहभाग**

**बीड । प्रतिनिधी**

अभियांत्रिकी शिक्षण केवळ वर्गखोल्यांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष कार्यपद्धतीशी जोडले गेले पाहिजे, या उद्देशातून आदित्य पॉलिटेक्निक, बीड येथील प्रथम व द्वितीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांची भारतीय रेल्वे, बीड येथे औद्योगिक भेट आयोजित करण्यात आली.



सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत झालेल्या या भेटीत विद्यार्थ्यांनी रेल्वे मार्गरचना आणि सुरक्षिततेचे प्रत्यक्ष निरीक्षण, रेल्वे अभियांत्रिकीची प्रत्यक्ष माहिती आत्मसात केली. आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा व संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राचार्य डॉ. राहुल खडके यांच्या अधिपत्याखाली ही भेट पार पडली. रेल्वे स्टेशन, बीड येथे विद्यार्थ्यांनी ट्रॅक लेआउट, पुलांची रचना, देखभाल पद्धती आणि ▶▶ उर्वरित पान २ वर

**प्रत्यक्ष अनुभवातून तांत्रिक दृष्टिकोन विकसित**

**औद्योगिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना रेल्वे ट्रॅकची रचना, पूल बांधकामातील तांत्रिक बाबी, सिग्नल प्रणाली व देखभाल प्रक्रियेची प्रत्यक्ष माहिती मिळाली. त्यामुळे वर्गात शिकविल्या जाणाऱ्या विषयांचा अधिक सखोल व स्पष्ट अभ्यास करण्यास मदत झाली. भारतीय रेल्वेमधील स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रातील विविध नोकरीच्या संधी, जबाबदाऱ्या व कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शन मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये करिअर**

### सौ. के.एस.के महाविद्यालयात बाळशास्त्री जांभेकर जयंती उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

सौ. के.एस.के महाविद्यालयात मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक, आद्य पत्रकार 'दर्पणकार' आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला नवगण शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वंभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर आणि शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.